**कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,**
**खोली क्र. ३९-४१, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०००५१.**

**जा.क्र.: का.अ.(प.उ.)/इपक/बृ.क्षे./म्हाडा/ET- /२०२६**
**दिनांक :-** 20 AUG 2026

**प्रति,**
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा,
पहिला मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-** पंतनगर, घाटकोपर, येथील इमारत क्र. **१३५, पंतनगर विशाल सह.गृह.नि.संस्था मर्या.**, न. भू.क्र. ५७०७ (भाग) व ५७०८ (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५ या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत.

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२०/अ नै २७/ प्र.क्र. ८०/२० नवि-१३, दि. १४.०१.२०२१.
२. म्हाडा परिपत्रक क्र. एम.एच./मुं.मं.-२/उप. मुख्य अ./इ.प.क./बृ.क्षे./प्रा./ ईटी-४५४/२०२१, दि. २३.०२.२०२१.
३. या कार्यालयाचे Amended Plan मंजूरी पत्र क्र. MHADA-१/४७७/२०२३, दि. १४.०२.२०२६.
४. विकासक, मे. सप्तर्षी इन्फ्राकॉन एलएलपी, यांचे या कार्यालयास दि. १८.०८.२०२६ रोजीचे पत्र व दि. १८.०८.२०२६ रोजीचे हमीपत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र. २ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या परिपत्रकान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकाला पुनर्विकास इमारतीच्या आराखड्यांना मंजूरी देताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आकारण्यात आलेल्या अधिमुल्य रक्कमेकरिता मे. सप्तर्षी इन्फ्राकॉन एलएलपी यांना ५०% सुट देण्यात आलेली आहे. या पुनर्विकास प्रकल्पातील EWS/LIG/MIG/HIG क्षेत्रातील घरे/सदनिका/वाणिज्यिक-औद्योगिक इतर गाळे घेणाऱ्या ग्राहकांना देय मुद्रांक शुल्काचा भरणा विकासक (मे. सप्तर्षी इन्फ्राकॉन एलएलपी) यांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ विकासकांना देण्यात आलेला आहे.

विषयांकित इमारतीच्या पुनर्विकासाच्या आराखड्यांना मंजूरी देताना विकासक मे. सप्तर्षी इन्फ्राकॉन एलएलपीयांना दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण ६०२.८५ चौ.मी. (निवासी वापर) करिता फंजिबल अधिमुल्य रकमेवर ५०% सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने विकासकांनी ४९२.१३ चौ.मी. (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या ०८ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करण्यासंबंधी खालील बाबींची पुर्तता करावयाची आहे.

I. या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरीता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

II. अशा प्रकल्पामधील मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात आला असल्याने लाभार्थी ग्राहकाचे प्रमाणपत्र विकासकास नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

III. विकासकाने ज्या ग्राहकांच्या अशा प्रकारे मुद्रांकांचा संपूर्ण खर्च केला आहे, त्यांची यादी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी लागेल.

IV. जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरीता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल. तसेच संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द् करावी लागेल.

त्यानुसार विकासकांनी ४९२.१३ चौ.मी. (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या ०८ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करणे आवश्यक आहे. सदर इमारतीत विकासकामार्फत ०८ सदनिकांची विक्री करण्यात आली आहे. सदर ०८ सदनिकांच्या विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने केल्याबाबत हमीपत्र सादर केले आहे. विकासकाने ०८ सदनिकांचे सह दुय्यम निबंधक, मुंबई २८ व सह दुय्यम निबंधक, मुंबई २९ यांचेकडे विक्री करारनामा नोंदणी केलेल्या ग्राहकांचे प्रमाणपत्र व सूची क्र. २ या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर ०८ सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे असून सोबत परिशिष्ट-अ मधील माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**सोबत :-** परिशिष्ट-अ

आपला विश्वासू,

Jadhav

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

**प्रत :-** मा. उपमुख्य अभियंता / इ.प.क. / प्रा. यांना माहितीकरीता.

# परिशिष्ट – अ

पंतनगर, घाटकोपर, येथील इमारत क्र. **१३५, पंतनगर विशाल सह.गृह.नि.संस्था मर्या.,** न. भू.क्र. ५७०७ (भाग) व ५७०८ (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५या इमारतीच्या पुनर्विकासामधील खालील सदनिकांच्या विक्री करारावर मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासक, मे. सप्तर्षी इन्फ्राकॉन एलएलपी, यांचे मार्फत करण्यात आला आहे. सदर लाभार्थी ग्राहकाची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवासी सदनिका क्रमांक | बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. | विक्रीबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १. | सदनिका क्र. १००१, | ५८.५८ | Mr. Ramnath Sankataprasad Kesari & Mrs Shashi Ramnath Kesari यांना विक्री करण्यात आले आहे |
| २. | सदनिका क्र. १२०२, | ६०.९३ | Mr. Prashant Kantilal Lathia यांना विक्री करण्यात आले आहे |
| ३. | सदनिका क्र. १४०२, | ६०.९३ | Mrs. Vaishali Sandeep Kardak & Mr. Sandeep Vasant Kardak यांना विक्री करण्यात आले आहे |
| ४. | सदनिका क्र. १३०२, | ६०.९२ | Mr. Sharad Babusha Khandagale & Mr. Babusha Dagdu Khandagale यांना विक्री करण्यात आले आहे |
| ५. | सदनिका क्र. १५०१, | ८९.७६ | Mr. Rishi Kumar Pandey & Mr. Harsh Kumar Vinod Kumar Pandey यांना विक्री करण्यात आले आहे |
| ६. | सदनिका क्र. १५०२, | ६०.९३ | Mrs. Uma Mahesh Gaitonde & Mr. Mahesh Vasant Gaitonde यांना विक्री करण्यात आले आहे |
| ७. | सदनिका क्र. १५०३, | ४०.३८ | Mr. Babusha Dagdu Khandagale & Mrs. Hirabai B Khandagale यांना विक्री करण्यात आले आहे |
| ८. | सदनिका क्र. १५०४, | ५९.७० | Mr. Mukesh Chandrashekhar Chintalwar & Mrs. Arti Mukesh Chintalwar यांना विक्री करण्यात आले आहे |
| | **एकुण =** | **४९२.१३** | |

Jadhav

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष/म्हाडा